Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 09/08/2025**

# Activity Name: Day Special

## दिन विशेष


**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाटण्या, आतल्या वाटण्या... आपलं महानगर | My महानगर.com www.mymahanagar.com

## दिनविशेष

### संगीतसूर्य गायक नट केशवराव भोसले



केशवराव भोसले हे मराठी संगीत रंगभूमीवरील एक सुप्रसिद्ध गायक नट होते. त्यांचा जन्म ९ ऑगस्ट १८९० रोजी कोल्हापूर येथे झाला. जनुभाऊ निमकर यांसारख्या कुशल नाट्यदिग्दर्शकाचे मार्गदर्शन त्यांना लाभले. तर दत्तोपंत जांभेकरबुवा यांच्याकडून शास्त्रीय संगीताची तालीमही मिळाली. सुरुवातीस बालकलाकार किंवा स्त्री पात्राच्या लहानसहान भूमिका करताना त्यांना गोविंद बल्लाळ देवल यांच्या शारदा या नाटकात शारदेच्या भूमिकेची संधी मिळाली. या भूमिकेने त्यांचे नाव सर्वतोमुखी झाले.

यानंतर त्यांनी सौभद्र, मृच्छकटिक इत्यादी नाटकांतही सुभद्रा, वसंतसेना या भूमिका केल्या. त्याही खूप गाजल्या. १९०७ साली त्यांनी स्वदेश हितचिंतक ही नाटक मंडळी सोडली आणि १ जानेवारी १९०८ रोजी हुबळी येथे 'ललितकलादर्श संगीत नाटक मंडळी' ही नाट्यसंस्था स्थापन केली. सुरुवातीस ही नाटक मंडळी शारदा, सौभद्र वगैरे जुनी नाटके करीत असे. नंतर राक्षसी महत्त्वाकांक्षा हे नाटक जोमदार संवाद, कर्णमधुर संगीत आणि नावीन्यपूर्ण देखावे यामुळे त्याकाळी अतिशय लोकप्रिय झाले. यातील मृणालिनी या त्यांच्या स्त्री पात्रातील भूमिकेस रसिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. १९१५ मध्ये त्यांनी 'संगीत मानापमान' या नाटकाचा पहिला प्रयोग मुंबईत केला. पुढे मामा वरेरकर लिखित हाच मुलाचा बाप, संन्याशाचा संसार ही दोन सामाजिक नाटके केशवरावांनी रंगभूमीवर आणली. टिळक स्वराज्य फंडाच्या मदतीसाठी 'गंधर्व' व 'ललितकलादर्श' या नाटक मंडळ्यांतर्फे मानापमान नाटकाचा संयुक्त प्रयोग नाट्यगृहात झाला.

या प्रयोगास प्रेक्षकांचा अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळाला. त्यानंतर त्यांनी बालगंधर्वांसोबत सौभद्र या नाटकाचाही संयुक्त प्रयोग केला. टिपेच्या सुरांना सहज व स्वच्छपणे पोहोचणारा आवाज आणि अत्यंत प्रभावी तान हे त्यांच्या गायनाचे वैशिष्ठ्य होते. त्यांना अच्युत कोल्हटकर यांनी संगीतसूर्य असे संबोधले होते. अशा या श्रेष्ठ गायकाचे ४ ऑक्टोबर १९२१ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Aug 09, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401